# कविवर्य बाळकृष्ण भगवन्त बोरकर यांच्या कवितांतील प्रेमानुभवाची अभिव्यक्ति

- डॉ. सु. म. तडकोडकर

कविवर्य बाळकृष्ण उपाख्य बाकीबाब भगवन्त बोरक (नोव्हेंबर ३०,१९१०, कुडचडे - ते जुलै ८, १९८४, पुणे) (१) यांनी प्रामुख्याने अभिजात तसेच रसरशीत मराठी प्रेमकवितांचा अविष्कार करुन साहित्याच्या रसिकांना लुब्ध केले होते. त्यामुळे त्यांना *'आनंदनवनभुवनात मोहरणारा प्रेमकवी'* असे खचितच म्हणता येईल. १९३० ते १९८४ या कालखण्डात मराठी साहित्याला अनेक विचारप्रवाहांनी समृद्ध केले, खडतर अशा वादविषयांनी परिपक्व बनवले; हे जरी खरे असले तरी बाकीबाब यांनी मात्र त्याचा स्वत:च्या प्रतिमेला विशेष असा उपसर्ग होऊ दिला, असे वाटत नाही.

बालके ज्याप्रमाणे लोलक, रंगीत पिसे, विविध वर्णाचे खडे गोळा करीत जातात तसे मुळात कोंकणी भाषिक असलेल्या बाकीबाबनी शब्दांची संपदा एकत्रित केली आणि नंतर ती ते मदमस्तपणे उधळतही गेले. त्यांनी संस्कृत, बंगाली भाषांचेही अध्ययन केले होते. ज्यांना पोर्तुगीज वा फ्रेंच भाषांतील साहित्याशी विशेष परिचय आहे ते बाकीबाब यांच्या कोणत्या मराठी कवितेचा स्त्रोत या विदेशी भाषांतील कवितांत होता हे अधिक अधिकारवाणीने सांगू शकतील. त्यांनी ब्राझीलीयन कवीही वाचले होते हे वास्तवही ध्यानात घेतले पाहिजे. त्यांनी उर्दूचेही विशेष अध्ययन केले असणे अगदी शक्य आहे; परंतु त्यांच्या एकंदर कवितेत त्या भाषेतील शब्दांचा मुबलक वापर झाला आहे असे मात्र म्हणवत नाही. संस्कृत आणि कोंकणी संस्कृतीचा विशेष स्पर्श मराठीतील काव्याविष्काराला पुरेसा आहे असे त्यांना वाटले असणे शक्य आहे. त्या त्या भाषांतील प्रेमभावनांशी बाकीबाब यांचे चांगलेच जमले असेही म्हणता येईल. बव्हंशी मराठीतील प्रेमकवितांच्या कर्त्यांनी त्यांच्या आसपास अस्तित्वातच नसलेली, मनातल्या मनात उबवलेली प्रेमभावना व्यक्त केली. अशा भावना जगण्यासाठी जे मुक्त जीवनाचे वातावरण हवे असते तेच त्यांच्या समाजात मुळातच नव्हते. कालांतराने पाश्चात्य साहित्याच्या वाचनातून ती प्रेमभावना साकार होत गेली आणि नंतर तोच त्यांचा काव्यलेखनासाठी हवा असलेला आविर्भाव बनून गेला असे जरी असले तरी त्यांची प्रेयसी ही कल्पितातील आहे. त्यात फुटकळ मदमस्तपणा आला तरी तोही कल्पितातीलच होय. वास्तव जीवनात आपल्या प्रियकराला साद घालत असताना 'दादा' आणि 'भाई' अशी साद घालावी लागत असे आणि या दादाला किंवा भाईला 'ताई' म्हणून प्रतिसाद द्यावा लागत असे. त्या काळातली मराठी प्रेमकविता कविसंमेलनांत गायला ठीक असली तरी तिचा आविष्कार म्हटले तरी तो कृत्रिम किंवा चोरटाच होता असे म्हणावे लागते. आजच्या अधिक मोकळ्या वातावरणात असूनही इतरत्र भेटणाऱ्या स्त्रियांशी सोडाच स्वत:च्या पत्नीशीही नीटसपणे न बोलू शकणारे कित्येक जण प्रेमकविता लिहितात. त्यांना प्रेमविषयक वृत्ती झाली आणि त्यानंतर त्यांनी प्रेमकविता लिहिल्या तरी ती पुस्तकी म्हणूनच फुटकळ स्वरुपाची असते हे वास्तवही ध्यानात ठेवायला हवे.

म्हणूनच मराठीतली प्रेमकविता ही बाकीबाब यांच्याशिवाय अपूर्णच राहील अशीच तिची

मातब्बरी आहे कारण ती अस्सल अशा गोमंतकीय वातावरणात उमलली आहे, बहरली आहे, बाकीबाबच्या प्रेमकवितेचे गोमंतकीय जीवनाशी अत्यंत निकटचे संबंध आहेत. विसाव्या शतकाच्या आरंभी, अपवाद वगळता, सतराव्या शतकातील ख्रिस्ती पाद्रींनी केलेल्या धर्मच्छलाला विसरून जायला लावणारे मुक्तिपूर्व गोमंतकातील जीवन होते. उदारमतवादी असलेल्या आन्तोनियु जुजे द आल्मेद या पुर्तुगालच्या पंतप्रधानाच्या ध्येयधोरणांमुळे सर्वसामान्यपणे कोंकणे (म्हणजे आजच्या भाषेत 'हिंदू') किरिस्तांव आणि मयर (म्हणजे आजच्या भाषेतील मुसलमान) यांच्यातील सौहार्दाचे नाते वाढीला लागले होते त्यामुळे सर्वसाधारणपणे पोर्तुगीजांच्या सहवासात मनसोक्तपणे जगू पाहणाऱ्याचे जगणे अधिक रसाळ बनले होते. पाश्चात्य साहित्य, संगीत आणि इतर कला यांचा बहर या भूमीत होताच शिवाय या वातावरणात तत्कालीन मराठीतील साहित्यही अधिक खुमारी आणीत असे. साधारणतः अफाट मोकळे असले तरी अभिजात स्तरावर नेटके तसेच संयम पाळणारे सामाजिक वातावरण, धुंद करणारा निसर्ग, क्षणांना थरार आणणारी कामिनी, मद्य आणि संगीत यांच्या सान्निध्यातील वातावरणात बाकीबाब यांच्यासारख्या कवीत निद्रिस्त असलेल्या प्रेमभावनेचा आविष्कार व्हायला कितीसा वेळ लागतो? बाकीबाब यांच्या कवितेतील प्रियकरावर चोरून प्रीती करण्याची पाळी कधीच आली नाही. त्या वातावरणातील गोमंतकात, काही ना काही कारणासाठी, स्त्री आणि पुरुष यांचे जवळ येणे हे काही केवळ कल्पितातली घटना नसायची. स्वतःच्या बालपणात, पर्वरी येथील एका विद्यालयातील आठव्या इयत्तेत अध्ययन करीत असताना स्वतःच्या वर्गातील अल्लड मार्गारिद नावाच्या बालिकेने त्यांना त्यांच्या ध्यानीमनीस्वप्नी नसताना अवचितपणे दिलेल्या एका चुंबनामुळे दिव्य प्रीतीभावनेचा साक्षात्कार झाल्याचे दस्तुरखुद्द बाकीबाब यांनी विदित केले होते :

*असा कसा मी तरुण निरंतर सांगू कैसे तुला*
*सहज अचानक झाकुन डोळे तिने चुंबिले मला*

त्यांनी त्या वयात प्रसंगपरत्वे अभंग म्हणले असतील; परंतु प्रेमानुभवाने जसे ते उत्फुल्ल होत तसे ते इतर अनुभवांविषयीच्या आविष्कारावेळी होत असत असे मात्र दिसत नाही. 'मी अभंग गाणार नाही' असा शब्द त्यांनी स्वतःच्या आजीला दिल्याबद्दल ते मनातल्या मनात पराकोटीचे आनंदीत झालेच नसतील कशावरू ? 'कांचनसंध्यें'त '*स्मशान असावे दोन हांकावर*' असे म्हणत असताना खरोखरीच त्यांना 'कृतान्त कटकामलध्वजजरा' दिसत होती काय याविषयीची शंकाच निर्माण होते. 'आपण धारवाडला गेल्यानंतर गोव्यातील निसर्गासाठी झुरु लागलो', असे बाकीबाब यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. तो निसर्ग म्हणजे स्वतःतन्न दडलेल्या प्रीतीसाठीची हुरहूरच असावी यात मला शंका वाटत नाही. त्यांना तेथील वास्तव्यात असताना 'चिमणे जगत्' ही कविता आली :

*ती पूर्वीची प्रीत पळाली बिजोड तो संसार*
*बालपणीचे सौख्य निमाले आनंदाचे सार (२९/७/१९२८)*

ही खरोखरीची खंत होय. त्यांनी गोव्याहून मुंबईला जाण्यासाठी केलेल्या जलप्रवासात 'माझी आगबोट' ही कविता लिहिली. तीत :

*माझी आगबोट चालली दरियात ग, दरियात ग*
*मन धावत तरि तव, हृदयात ग (१/१२/१९२९)*

अशी मनस्थिती प्रकट झाली आहे. ही तर तना-मनात दडून असलेल्या प्रेयसीपासून दूर जाणाऱ्याची मनस्थिती होय. कदाचित तो एखाद्या अतृप्त प्रीतीचा गाथाही असू शकेल. आनंदमयी काव्याविष्काराला असफल प्रीतीची शोककथा लिहिता येईल काय? बाकीबाब यांनी नकली भ्रमरी सौंदयर्याकडे आकर्षित होण्याचे व त्याच मस्तिष्कात सौंदर्यासक्त राहण्याचे वय सहजपणे ओलांडले. त्यांना लवकर विवाह करायचा नव्हता याचे कारण बेबंध जगण्यासाठीत नव्हते तर त्यांना अध्ययनातील वरच्यावरच्या इयत्ता संपादन करण्यासाठीत होते. ती इच्छा अपूर्ण राहिल्याची खंत सततची राहिली. तरीही स्वत:हून, इतरांचे दडपण नसतानाही, त्यांनी घरचा ज्येष्ठ पुत्र या नात्याने वैवाहिक बंधन स्वीकारले. अशा परिस्थितीत असतानाही बोरकरांनी स्वत:च्या पत्नीवर, तिच्या अंगकांतीत दृग्गोचर होणाऱ्या खानदानीच्या तेजस्वितेवर आणि चालीतल्या निर्भयतेवर अतोनात मृदुमधुर करुणाभाव असलेली प्रीती केली हे वास्तवदेखील ध्यानात घ्यायला हवे. त्यांना स्वत:च्या पत्नीस केन्द्रस्थानी ठेवून जितक्या कविता लिहिता आल्या तितक्या इतर मराठी कवींना जमल्या का? असा प्रश्न दृष्टीसमोर ठेवून एक सुरेखसा संशोधनपर आलेख काढता येऊ शकेल.

संयत शब्दांत स्त्रीच्या अंगोपागांचे वर्णन करण्यासाठी प्रतिभेला बाकीबाब यांच्याव्यतिरिक्त कोण उपलब्ध होता? स्त्रीच्या पाठीला लुच्चे डोळे असतात. त्याच पाठमोरीला पाहून हा कवी काय म्हणतो?

*पाठमोरी मूर्ति तूझी पाहिली मी कौतुकें,*
*वाटलें त्वकुन्तलीं गे गुन्तली सारीं सुखें*
*भार त्यांचा गाढ काळा मेघ आषाढांतला*
*का फुलांच्या मार्दवें मानेवरी भारावला?*
*..भाग मानेचा खुला हा गे बिजेचा चन्द्रमा*
*अम्बराच्या नीलिम्याला गे उणी स्वर्गोपमा*
*कान्तिपानें धुन्द झालें गर्द हें नीलाम्बर*
*पोत-छे ! स्वर्जान्हवीचा झोत हा पाठीवर*
*पाठमोरी तूं बिजेची रात्र, लावण्यें रमा*
*हासुनि पाही वळोनी, होऊ दे ना पौर्णिमा* **(पाठमोरी पौर्णिमा, २/३/१९४१)**

त्यांच्या एका काव्यात मानिनीच्या डोळ्यांचा तोरा दाखवणारे वर्णन साक्षात होऊन येते तर दुसऱ्यात तिची करुण मनस्थिती :

*डोळे तुझे बदामी देती मला सलामी*
*त्यानेंच हा असा मी झालों गडे निकामी*
*लागे न चित्त धार्मी लागे न चित्त कामी*
*मोठे लबाड लुच्चे डोळे तुझे बदामी* **(डोळे तुझे बदामी, २९.११९४७)**

*आज तुझ्या नयनांत मानिनी ! शरणागति अनुताप*
*हास्यविनोदामध्यें तुझ्या अन् सलज्ज मूक विलाप*
*व्यथा परी मम आज मानिनी तिला न करावे दान*
*नव्या विलासमाधें तिच्या गे जुना तुझा अभिमान* **(मानिनी, ३१/८/१९५०)**

आंतरीकपणे स्वत:च्या पत्नीची आठवण झाली तरी कात न बनता उत्फुल्ल होऊन हा कवी लिहून जायचा :

*त्या दिसा वडाकडेन गडद तिनसानां*
*मंदमंद वाजत आयलिं तुजिं गो पायजणां*

आपण फुलपाखरासारखे उच्छृंखल, विभ्रमशील, तरल आणि भडक आहोत, 'रसलंपट मी' (**भिडली रात्र पहाटे**, १६ मार्च, १९४५), असे स्वत:कडून म्हणवून घ्यावे इतपतचे वास्तव त्यांना खचितच ज्ञात होते. कवीच्या ठिकाणी हे गुण असल्यानंतर आणि या गुणांस आवश्यक असे चौफेर पोषक वातावरण असल्यानंतर रोगटपणा किंवा किरकिरेपणा किंवा उपहास व्यक्त करण्याच्या वृत्ती-प्रवृत्तीतील उर्मीने मळमळत राहणे शक्यच नव्हते. प्रीती करणे हा त्यांचा मनोधर्मच होता, हे खरेखुरे कारण होते. म्हणूनच 'रातवेळी वेणुनादे नाग येई मोहुनी' (१९३१) असे म्हणत कविवर्य भा. रा. ताम्बे यांच्या प्रेमकवितांना शरण गेले (१९३२) तसेच मनाने नीतीपासून मुक्त राहण्याचे महत्व सांगणाऱ्या रुपलावण्यलतिका दोना प्रोपेर्सिय कुन्हेय आफोंसु इ फिगैरेदु या प्राथमिक विद्यालयातील एका शिक्षिकेच्या सान्निध्यात काही काळ राहिले (१९३३) अन् पुढे प्रगाढ प्रीतीगर्भ आशय असलेल्या कविता लिहू शकले. ह्या विदुषीला त्यांनी 'आई' असे संबोधले आहे . (२) आनन्दवर्धनने 'ध्वन्यालोक' मध्ये सर्व कवींना शृंगार हा संसारी जनाच्या अनुभूतीचा विषय असल्याने त्याचा निनियोग सावधपणे केला पाहिजे असे बजाविले आहे. बहुधा बाकीबाब यांनाही त्याची आरंभापासून जाणीव असावी;

पार्थिवतेच्या क्षितिजापुढतीं जाउनि ही राहिली
आणि मज माउलीच जाहली (**आणि मज माउलीच जाहली, ३०.६.१९६४**)

दोना प्रोपेर्सिय कुन्हेय आफोंसु इ फिगैरेदु ज्या काळात भेटली त्याच काळाच्या आसपास स्फूर्तीदेवता बनलेल्या आणखी एका ख्रिस्ती सहाध्यायी विद्यार्थिनीशी त्यांचे निकटचे नाते निर्माण झाले. पुढे पंचवीसेक वर्षांनंतर तिची भेट झाली त्यावेळी :

आणि रुळवीत उभार उरोजांच्या मधोमध
उभट नाजूक झिगझिघणारा
कांचन क्रुस....
...होतीच तशीच आहेस अजून
व्हर्जिन मेरी, पण सुखदु:खांची तड ओलांडलेली (**कृतार्थ, ११.८.१९६४**)

अशा ओळी लिहिल्या गेल्या. प्रीतीत तृप्ती आणि अतृप्ती या अनुभवांचे अनन्यसाधारण स्थान आहे. त्यापैकी अतृप्तीचे प्रकटीकरण होत असताना तर डोळ्यांत येणारे व्याकुळ अश्रू अतृप्तीच्या अनुभवांना

गहिरे बनवितात :

*अदृढ असल्या सुखद क्षणाला आलिस तूं अदये*
*न मागिता तूं मागितलें जें मीही देउं नये*
*आज राहिला ऐंकच तरी मन गहिरा अंधार*
*सतेज त्यांचीं स्वप्ने मजला होती आधार* ***(-स.६.११.१९६५)***

यापूर्वी बाकीबाब यांनी लिहिले होते:

*परलोकीची दुर्मिळ सजणो अंतरंगिची कळ*
*तू गुदमरविसी चुंबिता* ***(कडकडूनी आलिंगिता)***
*मग करिता, कुडिची घडी गोड ये जीवाला भोवळ* ***(गोड कळ)***

बाकीबाब यांनी शरीर प्रेम नाकारण्याचा आणि स्वर्गीय प्रीती करण्याचा दावा करण्याचा खोटेपणा केला नाही, शरीराचे माध्यम घेतल्यानेच धुंद, रंगेल आणि हलकल्लोळातून साकार होणारा प्रीतीचा विलक्षण सुंदर अनुभव काव्यानुभवाला गडद बनवतो 'स्मृति' 'स्पर्श' 'जपानी रमलाची रात्र', 'श्यामा' या रचनांमुळेच मराठी प्रेमकाव्यांला उधाण आले; परंतु उत्तानपणा लाभला नाही. उदाहरणादाखल पुढील काही चरण पहाता येतील :

*रात होतं शांत सारी, गाल गालां लाविले*
*भोगिलें ऐश्वर्य सारें स्पर्श संगीतांतले* ***(स्मृति, ९.१.१९४१)***

*तुझें विजेचें चांदपाखरूं दीपराग गात*
*रचीत होतें शयनमहालीं निळी चांदरात*
*रतिरत कुक्कुटसा कुंडीवर अरोहुनि माड*
*चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचे झाड*
*... करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले*
*जळता गंधक पाच उकळती यांहि रंगलेले*
*अभीष्ट चिंतुनि आम्ही त्यांचे भिडवियले कांठ*
*सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनी ओठ*
*स्पर्शे तुझिया आणि पियानो थरारला सारा*
*मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा*
***(जपानी रमलाची रात्र, २९.११.१९४३)***

*द्रवलीं नयनें स्त्रवलीं हृदयें*
*दो चन्द्रांच्या संगम उदयें*
*दुणी पौर्णिमा, रसा न सीमा उसळ्यांवर उसळ्या*
***(स्पर्श, २७.१०.१९५५)***

वयाच्या पंचविशीपर्यंत पुरुषाचे मनोविकार निश्चित झालेले असतात असे मानले तर बाकीबाब

यांच्या मनोधर्मानि पुढील जीवनावकाशात काव्यलेखनाविष्कार कसा केला हे ध्यानात घेता येते. ते मधुरा भक्तीचे पुरस्कर्ते खचितच नव्हते. बाकीबाब यांनी कृष्ण-राधाच्या प्रणयाची झलक ताम्बे यांनाही पहिल्याच भेटीत दाखविली होती:

*ढकलिता तुशी*
*अधिक बिलगशी*
*शिथिल तनू ही करिसी रे तू*

**(विरोधी भक्ती, २७.१.१९३२)**

*स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा*
*तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नी शोक हवा*
*इन्द्राचा मज भोग हवा अन् चन्द्राचा हृद्रोग हवा*
*योग असो रतिभोग असो अतिजागृत त्यांत प्रयोग हवा*

**(२०.६.१९५१)**

*तूं आलीस पेलित अंगी वेल विजेची*
*अधरावर झेलीत अमृतकोर बिजेची*

**(श्यामा, ८.५.१९५२)**

या काव्यरचनांतील शारीर प्रीतीला आलेले उधाण हे कृष्ण-राधा यांच्या मीलनाच्या द्वारे संभोगशृंगाराचा चरम स्तर चित्रण घडविणाऱ्या संस्कृत कविराज जयदेवांच्या 'गीतगोविंद' पेक्षा वेगळे आहेसे वाटत नाही. धुंद वासना परिप्लुत अनुभूतीच्या द्वारे शारीर श्रेष्ठत्वाचा गौरवच नाही का? प्रीती भावनेची अनुभूती हीही एक प्रकारे प्रतीती घेणाऱ्यास आव्हानच ठरते. कधीकाळची स्मरणे वेदनादायक होतात... पावा कुठून घुमतो हे कळत नाही. कृष्णाचे आगमन का होत नाही हे उमजत नाही. ती अगतिकता, डोळ्यांत अश्रू असतानाही पावसाच्या एकामागून एक अशा सरी येत राहतात. हृदयापासून आनंद व्यक्त करण्याचे क्षण आलेले असतात. कृष्ण तर अद्यापि दडलेलाच. तो भेटतच नाहीये. खोल अंतरंगात निर्माण झालेल्या करुण स्वरांमुळे शब्दांचे चरण करुण बनण्याचाही क्षण येतो; परंतु निसर्गात तर चौफेर शृंगार चाललेला. विप्रलंभ शृंगाराचे रुप धारण करीत प्रीतीची ही अनुभूती, तरल पण कातर स्वरात शब्दबद्ध होऊन, साकार होते तेव्हा तर बाकीबाब यांच्या प्रतिभेला नमस्कार करावासे वाटते:

*सरिंवर सरी आल्या ग*
*सचैल गोपी न्हाल्या ग*
*... वनात गेला मोर भिजून*
*गोपी खिळल्या पदीं थिजून*
*घुमतो पावा सांग कुठून ?*
*कृ[illegible] कसा उमटे न अजून?*
*वेली ऋतुमती झाल्या ग*

*सरिंवर सरी आल्या ग*

***(सरिंवर सरी आल्या ग , २४.६०.१९६०)***

जर स्त्रीने पुरुषाला प्राकृतिक आव्हानच दिले असेल तर सामान्यपणे ते वास्तव न स्वीकारण्याचा बहाणा करणारे आपण कोण ? साक्षात् अभिनवगुप्ताने म्हटले आह. 'स्त्रीति नामापि मधुरम्।' (स्त्री ही संज्ञाच मुळी किती मधूर !) भरतमुनी म्हणतात : 'सुखस्य हि स्त्रियो मूलम्।' (सर्व सुखाचे मूळ स्त्रीतच !) विश्वनाथानेही स्त्री ही शृंगाररस निर्माण करणारी नायिकाच ! असे म्हटले आहे. बाकीबाब यांच्या काव्यातील स्त्री तर सर्व कार्यकलापांत निपुणच आहे :

*तुझ्या दृष्टिपाते हृदयी उमलला फुलोरा*
*आसबाष्पबिंदू करिती त्यावरी विहारा*
*... नेत्रपल्लवी जीवाची काव्यरम्य भाषा*
*सुखे नेई बाह्यांगाची बंधने विनाशा*

***(नेत्रमीलन, ५.४.१९२९)***

*नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले*
*आषाढच्या घनें कां त्वन्नेत्र भारलेले ?*
*होसी रसार्द्र केवी झुकतेस द्राक्षवेली ?*
*ओठांत वेदनेची मदिराही साठलेली ?*

***(प्रणयमुग्धेस, १३.१२.१९३०)***

*भुवनीं, भवनी हृदय-उपवनीं*
*तरल, विरल तर पवनावरणीं*
*मृदुल मधुरतर स्वरलहरींनीं*
*अखंड करि संचार*

***(करि सुंदरि स्वरशृंगार, १९३३)***

जरी असे असले तरी त्यांनी स्त्री-शरीर ही एक उपभोग्य वस्तूआहे, असेही मानले नाही. भोग-उपभोग या अनुभवांच्या पलिकडेही हृदयागारातच असलेला वेगळा उजळणारा प्रदेश आहे. त्यासाठी तर प्रीतीला साकडे घालायचे असते :

*भुले जो केवळ देहसुखा*
*स्पर्शे का तो शकेल उजळू हृदयांतील अलका*

***(हरिच्या स्मरभुवनी, ०४.११.१९४१)***

*याच डहाळीखालती झाले उन्हाचे चांदणे*
*आणि छायेने प्रकाशा तिढे घातले उखाणे*
*'रती असून मी सती' बोले हेलावत फांदी*
*माझ्या शुकाच्या मुखात नवी ओलावते नांदी*

***(कामद्रुमाची डहाळी, १३.९.१९५७)***

*सर सोन्याची होऊन आलिस*
*गाढ कालची झाली ओढ*
*आज लाभल्यामुळें हृदय तव*
*विष हि कालचें झाले गोड*
***(हृदयच जेव्हा होते कोकिळ, २४.९.१९५७)***

प्रीतीचा वर ज्याला लाभतो त्याला त्यात जळण्याचा शापही लागलेला असतो हे बरिक खरेच! प्रीतीचा सहवास ऐऱ्यागैऱ्याला थोडाच गवसणारहे ! जर प्रीती म्हणजे कामवासनाच, असे मानणाऱ्या स्त्रीच्या अस्तित्वाचा स्पर्श होता तर तो कवी होता ? दाहक क्षणांना निर्भीडपणे भिडू पाहील त्यालाच प्रीतीच्या जळण्यातही अवर्णनीय सुख आहे हे वास्तव आकळू शकेल, यात शंका ती कसली? पन्नाशीत पोहोचल्यानंतर बाकीबाबना तितक्याच निरामयतेने तो अनुभव घेता येत होता :

*जळण्यांतहि सुख आहे ज्वालातून फुलण्याचें*
*ढळण्यांतहि गुज आहे अंतिम हित कळण्याचें*
*स्त्रवण्याचा वर भेटे जळणाऱ्या अधराला*
*हृदयींचा हर भेटे ढळलेल्या पदराला*
*पडराऱ्या गति लाभे अपुल्यांतच चढण्याची*
*कढणाऱ्या युति लाभे रतिवाचुन बुडण्याची*
*जळतों मी, ढळसी तूं आव्हानित मरणाला*
*अमराचा अळिता सखि अपुल्या पण चरणाला (१४.१०.१९६०)*

कालमानानुसार, बाकीबाब म्हणतात म्हणून त्यांच्या वर संतकवी ज्ञानेश्वर, संतकवी सोहिरोबानाथ आंबिये, महात्मा गांधी, भा. रां. ताम्बे, आचार्य रामचन्द्र शंकर नायक, यशवन्तराव सरदेसाई, बालकवीं, रवीन्द्रनाथ ठाकूर, काकासाहेब कालेलकर यांचा ठाशीव प्रभाव पडत गेला असे घडींभर मानू: अन् तीही त्यांच्या आत्म्याची साक्ष गृहीत धरून. द्राक्ष ते रुद्राक्ष स्वीकार करण्याचा प्रवास बाकीबाब यांनी एकसमयावच्छेदेकरून केला हा त्यांच्या प्रतिभेचा विलक्षण कार्यकलाप होय. वृद्धत्वापर्यंत प्रवास करूनही तो संध्याकाल म्हणजे सोनेरी सौन्दर्याने बहरलेली 'कांचनसंध्या' होय असे मानणारा पथिक केवळ एकमेवाद्वितीयच. असे का होते? या प्रश्नाचे उत्तर शोधायचे झाल्यास दोन बाबी ध्यानात घेता येतील; पहिली बाब म्हणजे जीवनातील सौंदर्य, भावतल्लीन करणाऱ्या कवितेच्या रचनाबंधात आहे, केवळ प्रीतीचे उन्मादक प्रकटीकरण करण्यात वा उसासे सोडण्यात नाही हे वास्तव त्यांनी स्वीकारले होते. दुसरी बाब म्हणजे ऐन तारुण्यातही शरीर प्रेमाचे प्रकटीकरण करीत असताना बाकीबाब यांच्या कवितांत आदर्शांची भक्ती करणारा मनोधर्मही उमटून येऊ लागला होता. भक्ती ही काही म्हटले तरी प्रीतीच असते. भक्तीचा स्थायीभाव प्रणयच; तोही मनाला शांत मग्न करु शकतो. म्हणूनच पुढील चरण मनाला सुशांत बनवतात :

*मध्यरात्री नभघुमटाखाली*
*शांतिशिरी तम चवऱ्या ढाळी*
*त्यक्त, बहिष्कृत मी त्या काळी*
*एकांती डोळे भरती*
*तेथे कर माझे जुळती*

*ज्या प्रबला निज भावबलाने*
*करिती सदने हरिहरभुवने*
*देव-पतींना वाहुनि सुमने*
*पाजुनि केशव वाढविती*
*तेथे कर माझे जुळती*

ज्या ज्या वेळी प्रेमकवितेने आपण थरारुन उठू शकत नाही हीत असे वाटल्याने विषाद निर्माण होईल त्या त्या वेळी खचितच मराठी कवितेला बाकीबाब यांची सय येईल अन् तो म्हणेल :

*निजता गात्रे, निजता वृत्ती*
*कोण तरळते स्वप्नांवरती*
*अमर कवींच्या कवनांवरती*
*नाचुनि लावी कोण पिसे*
*जेव्हा माझ्या स्मृती उजळती*
*पुढची विश्वे नयनां दिसती*
*संकटकाली अति एकांती*
*हृदयस्पंदनी कोण ठसे*

(**वास्तव**, १९३२, महाराष्ट्र साहित्य संमेलन, कोल्हापूर येथे सादर केलेली कविता)

**संदर्भ सूची :**

१) बा. भ. बोरकर यांचे सर्व मराठी-कोंकणी साहित्य.

२) पाटील, गंगाधर........, *आदिमातेचा पुत्र*, लेखांक चौथा, **सत्यकथा**, मुंबई, सप्टेंबर-१९७७, पृ. २७-३२. या लेखात सुप्रसिद्ध मराठी समीक्षक प्रा. पाटील यांनी लिओनार्दो दा विंचीच्या एका चित्रातही आईविषयीचे मनोगत उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रा. पाटील सार्थपणे म्हणतात, ''निसर्गमाचेची तो (लिओनार्दो) लहान मुलाच्या निरागस मनाने भक्ती करी; परंतु निसर्गाकडे पाहताना त्याने रोमॅण्टिक दृष्टीचा अवलंब केला नाही,'' (पृष्ठांक २८) बाकीबाब यांच्या कविता वाचल्यानंतर प्रकर्षाने असाच प्रत्यय येऊ लागतो.